# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

---

### राज्यातील जिल्हा परिषदेच्या व खाजगी अनुदानीत शाळेतील शिक्षकांना सेवानिवृत्ती नंतरचे लाभ मिळण्याबाबत

**(१) २३८८ (२२-१२-२०१४). श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील जिल्हा परिषदेच्या व खाजगी अनुदानीत शाळेत दिनांक १ जुलै, १९७२ नंतर सेवेत लागलेल्या शिक्षकांना त्यांना सेवानिवृत्ती नंतर निवृत्ती वेतन, उपदान व अंश राशीकरण व निवृत्ती विषयक लाभ देण्यात आले नसून शासन स्तरावरुन कार्यवाही सुरु आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कार्यवाही केव्हा पूर्ण होणे अपेक्षित आहे तसेच तातडीने कार्यवाही पूर्ण करुन शिक्षकांना लाभ देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

दि.१ जुलै, १९७२ नंतर नियुक्त व सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यत प्रशिक्षित न झालेल्या अप्रशिक्षित शिक्षकांना दि. ४.१०.१९८३ च्या शासन निर्णयानुसार सेवानिवृत्ती वेतनाचे लाभ अनुज्ञेय नाहीत. तथापि, १.७.१९७२ नंतर सेवेत लागलेल्या प्रशिक्षित शिक्षकांना सेवानिवृत्तीवेतन विषयक लाभ देण्यात येतात.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ६५५ शाळांमध्ये मुलांकरिता व ७५६ शाळांमध्ये मुलींकरीता स्वच्छतागृहे नसल्याबाबत**

**(२) ६२९८ (०९-०४-२०१५). श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर), श्री.अबू आजमी (मानखूर्द शिवाजीनगर), श्री.संजिवरेड्डी बोदकुरवार (वणी), श्री.संजय (बाळा) भेगडे (मावळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील २३ टक्के शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृहेच नसल्याची माहिती सर्व शिक्षा अभियानाच्या आकडेवारीत माहे डिसेंबर, २०१४ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील ६५५ शाळांमध्ये मुलांकरिता व ७५६ शाळांमध्ये मुलींकरीता स्वच्छतागृहे उपलब्ध नाही तेथे स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करण्याची कार्यवाही प्राथम्याने सुरु करण्यात आली आहे काय,

(३) उक्त ठिकाणी त्वरीत मुले व मुलींकरीता स्वच्छतागृहे बांधण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

यु-डायस २०१४-१५ नुसार राज्यातील ०.७१ % शाळांमध्ये मुलींसाठी स्वच्छतागृह नाही.

(२) होय.

(३) सदर शाळांमध्ये मुलांकरिता व मुलींकरीता स्वच्छतागृहाचे बांधकाम पूर्ण करण्याबाबत आयुक्त महानगरपालिका व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निदेश दिले आहेत. त्यानुसार ८३३ स्वच्छतागृहांची कामे पूर्ण झाली असून ५६४ स्वच्छतागृहांची कामे प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**नवीन इंग्रजी माध्यमाच्या शाळांच्या प्रस्तावाबाबत**

**(३) ६९८३ (०९-०४-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.संजय सावकारे (भुसावळ) : तारांकित प्रश्न क्रमांक ९२ या दिनांक १२ डिसेंबर, २०१४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २००९-१० या वर्षामध्ये नवीन इंग्रजी माध्यमांच्या किती शाळांचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले व शासनाच्या विचाराधीन असलेल्या सदर प्रस्तावावर निर्णय घेण्याची सुरु असलेली कार्यवाही पुर्ण झालेली आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रश्नी केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार आतापर्यंत कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी सुरु असलेली कार्यवाही अद्याप पूर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी आतापर्यंत कोणता पाठपुरावा केला वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१), (२) व (३) शासन परिपत्रक दि. २८ मे, २०१० च्या जाहिरातीनुसार इंग्रजी माध्यमाच्या नवीन खाजगी शाळा सुरु करण्यासाठी एकूण ७४७५ प्राप्त झाले. प्राप्त प्रस्तावांपैकी एकूण ३११५ प्रस्तावांना जिल्हा व राज्य समितीची शिफारास प्राप्त होती. यासंदर्भात विधी व न्याय विभागाने दिलेल्या निर्देशानुसार शासन परिपत्रक दि. २८ मे, २०१० अन्वये इंग्रजी माध्यमाच्या नवीन खाजगी शाळा सुरु करण्यासाठी प्राप्त झालेले सर्व ७४७५ प्रस्ताव रद्द करण्याचा निर्णय शासनपत्र दि. ३० ऑगस्ट, २०१३ अन्वये घेतला असून सदरचा निर्णय सर्व संबंधितांना कळविण्यात आलेला आहे.

तथापि, यासंदर्भात शैक्षणिक संस्था, लोकप्रतिनिधी यांचेकडून या निर्णयाचा शासनस्तरावरुन पुनर्विचार करण्याची विनंती व त्या अनुषंगाने पत्रव्यवहार प्राप्त झाला आहे.

---

**वैद्यकीय शिक्षण संशोधन मंडळ (डी.एम.ई.आर.) अंतर्गत नर्सिंग प्रशिक्षणार्थीना एन.आर.एच.एम. नोकरीत सामावून घेण्याबाबत**

**(४) ८१९१ (०९-०४-२०१५). श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), श्री.बाबुराव पाचर्णे (शिरुर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैद्यकीय शिक्षण संशोधन मंडळ (डी.एम.ई.आर.) अंतर्गत नर्सिंग प्रशिक्षणार्थीना एन.आर.एच.एम. नोकरीत सामावून घेण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (अकोला प.) यांनी मा.वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांना दिनांक २८ जानेवारी, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास. उक्त मागणीनुसार सदरहू निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,

(३) अद्याप निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१६-१०-२०१५) :** (१) होय. तथापि, संबंधित सन्माननीय सदस्यांनी शासनास दि.९/६/२०१४ च्या पत्रान्वये विचारणा केली होती.

(२) याबाबत नमूद करण्यात येते की, या विभागाच्या अधिपत्याखालील रुग्णालयात परिचर्या संवर्गातील अधिपरिचारिका ही पदे सामाईक प्रवेश परीक्षेद्वारे भरली जातात आणि एन.आर.एच.एम. या योजनेंत्तर्गत सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधपित्याखालील रुग्णालयात परिचर्या या संवर्गातील पदे तात्पुरत्या स्वरुपात भरली जातात.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईमध्ये अनुदानित शाळांमध्ये अनधिकृत खाजगी शिकवणी**
**मोठया प्रमाणावर सुरु असल्याबाबत**

**(५) ८३९९ (०९-०४-२०१५). श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईमध्ये विशेषत: गोरेगांव (पू.) संतोष नगर येथील गुरुकुल विद्यालय व हरणाई विद्यालय या शाळांमध्ये अनधिकृत क्लासेस मोठया प्रमाणावर सुरु असल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत संबंधित शाळेचे संस्थापक पालकांची आर्थिक पिळवणूक व शिक्षकांचे मानसिक छळ करत असल्याबाबतची तक्रार शिक्षण विभागाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त शाळेच्या संस्थापकांवर व याप्रकरणी त्यांना मदत करणा-या दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) व (२) हे खर नाही.

(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**माध्यमिक शाळा संहिता आणि एमबीबीएस नियमांमध्ये बदल करण्याच्या प्रस्तावाबाबत**

**(६) १३५७५ (०९-०४-२०१५). ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात प्राथमिक शिक्षणाच्या पातळीवर सुरु असलेली शिक्षणहक्क कायद्याची अंमलबजावणी पुढच्या टप्प्यात नेण्यासाठी माध्यमिक शाळा संहिता आणि एमबीबीएस नियमांमध्ये मध्ये बदल करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावाचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे,

(३) असल्यास, सदर प्रस्तावावर कधीपर्यंत निर्णय होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (२४-११-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) व (३) माध्यमिक शाळा संहितेमधील तरतूदींना कायदेशीर स्वरुप प्राप्त करुन देण्याच्या अनुषंगाने शासनस्तरावर गुणवत्तेच्या आधारे तपासणी करण्यात येत आहे. तसेच शिक्षण हक्क कायद्याच्या अनुषंगाने एम.बी.बी.एस. नियमांमध्ये बदल करण्याबाबतचा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही.

---

## सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना वीज देयकास अनुदान देण्यात येत नसल्याबाबत

**(७) १४१०४ (०९-०४-२०१५). डॉ.सुरेश (भाऊ) खाडे (मिरज) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सांगली जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना वीज देयकास अनुदान देण्यात येत नसल्यामुळे अनेक शाळेतील वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर शाळांच्या वीज दर्जा व्यापारी यादीतून काढून सार्वजनिक सेवा या वर्गवारीत करुनही वीज देयकात कोणताही फरक पडत नसल्यामुळे शिक्षक वर्गणी काढून वीज देयक भरतात, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वीज देयक थकीत राहण्याच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

सांगली जिल्ह्यातील १७०९ पैकी ५४९ शाळांचा वीज पुरवठा खंडीत करण्यात आला आहे.

(२) अशी बाब काही शाळांमध्ये निदर्शनास आली आहे.

(३) सादील अनुदानापोटी मंजूर झालेल्या रक्कमेतून वीज देयकांची रक्कम प्राधान्याने अदा करण्यात येत आहे. तथापि, वीज दराबाबत तपासणी करुन संबंधित विभागाशी विचारविनिमय करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

---

## नवी मुंबईतील नेरूळ सेक्टर-३, येथील सेंट झेव्हियर एज्युकेशन ट्रस्टीच्या सदस्यांवर गैरव्यवहार प्रकरणी कार्यवाही न झाल्याबाबत

**(८) १५७३१ (०९-०४-२०१५). श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नवी मुंबईतील नेरूळ, सेक्टर-३ येथील सेंट झेवियर एज्युकेशन ट्रस्टीच्या सदस्यांनी गैरव्यवहार केल्याप्रकरणी नेमलेल्या चौकशी समितीने शासनास सन २००७ मध्ये त्याबाबतचा अहवाल सादर करूनही अद्याप त्यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी लोकप्रतिनिधींनी विद्यमान व तत्कालीन मुख्यमंत्री तसेच सचिव, शालेय शिक्षण विभाग यांना चौकशी अहवालाच्या प्रतीसह लेखी निवेदन दिले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली आहे व याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) सदर प्रकरणी प्रशासक नियुक्त करण्याच्या अनुषंगाने शिक्षण संचालक (माध्यमिक) यांनी महाराष्ट्र शैक्षणिक परिसंस्था (व्यवस्थापन) अधिनियम, १९७६ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्याबाबत शासन पत्र दिनांक ३ मार्च, २०१५ च्या पत्रान्वये आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास कळविण्यात आले होते,

(२) होय, हे खरे आहे,

(३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**मुंबईतील धारावी येथील अण्णानगरमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याबाबत**

**(९) १६७७१ (३०-०७-२०१५). प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील धारावी येथील अण्णानगरमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था सुरु करण्याबाबत उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या शासन निर्णय क्र.आय.टी.आय. २०१०/१७०/प्र.क्र.४८/व्यशि-३, दिनांक १८ सप्टेंबर, २०१२ च्या अनुषंगाने मान्यता दिलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर औद्योगिक प्रशिक्षण संस्था जागेअभावी व पदनिर्मिती अभावी मागील दोन वर्षापासून भायखळा येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेमध्ये घेण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरील ठिकाणी उक्त संस्थेच्या इमारतीचे बांधकाम व पदनिर्मिती त्वरीत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, त्यामागील सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१) व (२) व होय.

(३) संस्थेच्या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी भूखंड ताब्यात घेण्यात आला असून, आकृतिबंधानुसार संस्थेस आवश्यक असलेल्या १३ शिक्षकीय व ११ शिक्षकेत्तर पदांना मान्यता मिळण्याबाबत संयुक्त सचिव समितीच्या बैठकीत मान्यता घेण्याचे प्रस्तावित करण्यास येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मुंबईतील दादर-नायगाव येथील सरस्वती हायस्कुल ही मराठी शाळा संस्था चालकांकडून बंद करण्यात येत असल्याबाबत**

**(१०) १६९१६ (०६-०८-२०१५). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.नसीम खान (चांदिवली), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील दादर-नायगाव येथील सरस्वती हायस्कुल ही मराठी शाळा संस्था चालकांकडून बंद करण्यात येत असल्याने मराठमोळ्या विद्यार्थ्यांना शाळेतील प्रवेशापासून वंचित व्हावे लागत असून सदरील विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ मार्च, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्यमंत्री यांना निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील शाळा गव्हाणकर एज्युकेशन ट्रस्टला शासनाने शैक्षणिक कार्यासाठी ही जमिन भाडेतत्त्वावर अटी व शर्तीवर दिलेली असून ट्रस्टचे सदरहू भूखंडाचे व्यापारीकरण करण्याचे कृत्य चालू असल्याने शासनाने याबाबत सर्वतोपरी विचार करुन सदरील शाळेचा भूखंड व्यावसायिक कामासाठी न देता केवळ शैक्षणिक कार्यासाठी त्याचा वापर करावा, अशी येथील नागरीकांची इच्छा असल्याने शासनाने याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) सदर प्रकरणी आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालयास सविस्तर चौकशी करुन अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**डॉक्टरांवर होणारे हल्ले**

**(११) १७०५७ (१७-०८-२०१५). श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदेडच्या सरकारी वैद्यकीय रुग्णालयात चिकित्सा विभागात शिकत असलेल्या डॉक्टरांना दिनांक १२ मे, २०१५ रोजी रुग्णांच्या नातेवाईकांना मारहाण केली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अशाचप्रकारे सायन रुग्णालयात तीन निवासी डॉक्टरांवर हल्ला करण्यात आला होता, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे डॉक्टरांवरील हल्ल्यात वाढ होत असल्याने त्यांच्यामध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने डॉक्टरांच्या संरक्षणासाठी कोणती उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) होय, हे खरे आहे.
(३) हे खरे नाही.
(४) अपर मुख्य सचिव (गृह) यांनी त्यांचे दिनांक ०७/०८/२०१५ चे पत्रान्वये पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, सर्व पोलीस आयुक्त, सर्व पोलीस अधिक्षक यांना सूचना देवून Maharashtra Medicare Service Persons and Medicare Service Institution (Prevention of Voilence and Damage or loss to Property) Act, २०१०, दिनांक २०/४/२०१५ नुसार कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालयाच्या दिनांक ०३/०७/२०१५ च्या परिपत्रकांन्वये सर्व अधिष्ठाता यांना डॉक्टरांच्या संरक्षणाबाबत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्याबाबत निर्देश दिले आहेत.
अ) निवासी डॉक्टरांवर होणाऱ्या हल्ल्याबाबत कायदेशीर कार्यवाहीची तरतूद असल्याबाबतचे सूचना फलक रुग्णालयामध्ये कमीत कमी १४ ठिकाणी ठळक दर्शनी भागात लावावेत.
ब) फलक लावताना विभागाची व ठिकाणाची निवड प्रक्रियेमध्ये स्थानिक मार्ड संघटनेच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असावा.
क) रुग्णालयामध्ये अपघात विभाग, सर्व अतिदक्षता विभाग व प्रसूती पश्चात कक्षामध्ये सी.सी.टी.व्ही. कॅमेरा बसविण्याबाबत आवश्यक त्या सर्व प्रक्रिया पूर्ण कराव्यात
ड) संस्था स्तरावर सुरक्षा रक्षकांची वाढ करण्यात यावी.
इ) रुग्णांच्य नातेवाईकांच्या भेटीच्या दुपारी ४.०० ते सायं. ७.०० च्या दरम्यान कक्षात प्रवेश देताना एका रुग्णाच्या जास्तीत जास्त २ नातेवाईक / मित्र यांना प्रवेश द्यावे.

---

**औरगांबाद जिल्हयातील घाटी रुग्णालयात जिल्हा नियोजन समितीने डायलिसीसची पाच यंत्रे मंजूर केली असतानाही अद्याप खरेदी न केल्याबाबत**

**(१२) १७१६६ (३१-०७-२०१५). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरगांबाद जिल्हयातील घाटी रुग्णालयात जिल्हा नियोजन समितीने निधीसह डायलिसीसची पाच यंत्रे मंजूर केली असून गतवर्षी माहे सप्टेंबरमध्ये हा निधी मिळाल्यानंतर दिनांक ३१ मार्च, २०१५ पूर्वी ही खरेदी प्रक्रिया पूर्ण करण्यात वैद्यकीय शिक्षण विभाग अयशस्वी ठरल्यामुळे जुन्या दोन यंत्रावरच रुग्णांची डायलिसिस करावे लागत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आणखी पाच डायलिसिस यंत्रे खरेदी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) वित्त विभागाच्या निर्देशानुसार दिनांक १५ फेब्रुवारी, नंतरच्या खरेदीवर निर्बंध असल्यामुळे खरेदी आदेश निर्गमित झालेले नाही, सद्यस्थितीत संस्थेमध्ये उपलब्ध असलेल्या ३ हेमोडायलेसिस यंत्रापैकी कार्यान्वित असलेल्या २ यंत्रावर रुग्णांचे डायलेसिस करण्यात येत आहेत.

(२) संस्थेने सन २०१५-१६ या वित्तीय वर्षात ५ हेमोडायलेसिस यंत्रे खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास निधी वितरण व प्रशासकीय मान्यतेसाठी सादर केलेले आहे, यंत्रखरेदीबाबत उचित प्रस्ताव शासनास प्राप्त झाल्यानंतर कार्यवाही करण्यात येईल,

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील पदवीधर ग्रंथपालांना बीएड शिक्षकाप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत**

**(१३) १७४४९ (१२-०८-२०१५). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील पदवीधर ग्रंथपालांना बीएड शिक्षकाप्रमाणे वेतनश्रेणी देण्याबाबत गेली १५ वर्षे शासनाने दुर्लक्ष केले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने या ग्रंथपालांना बीएड शिक्षकांची समकक्ष वेतनश्रेणी देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) राज्यातील पदवीधर ग्रंथपालांना ५२००-२०२०० ग्रेड पे रु. २८०० इतके वेतन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे अंतिम निर्णय झालेला नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मुंबईतील कलिना विद्यापीठाच्या आवारात भुमिपूजन झालेल्या हिंदी व ऊर्दु भाषा भवनाच्या कामाबाबत

**(१४) १७५६६ (३०-०७-२०१५). श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील कलिना विद्यापीठाच्या आवारात सन २०१४ मध्ये शासनातर्फे डॉ.राममनोहर त्रिपाठी यांच्याकडून हिंदी भाषा भवन व डॉ.झाकीर हुसेन यांच्याकडून ऊर्दु भाषा भवनाचे भूमीपूजन करण्यात आले होते, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुषंगाने सदरील भवनाचे काम पुर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, उक्त काम पुर्ण झाले असल्यास ते केंव्हापर्यंत लोकार्पण करणे अपेक्षित आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) हे अंशत: खरे आहे. डॉ राममनोहर त्रिपाठी हिंदी भाषा भवन व उर्दू भाषा भवनाचे भुमिपुजन तत्कालीन उद्योगमंत्री यांच्या हस्ते सप्टेंबर २०१४ मध्ये करण्यात आलेले आहे.

(२) डॉ. राममोहन त्रिपाठी हिंदी भाषा भवन व उर्दु भाषा भवन बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. हिंदी भाषा भवन बांधकामासाठी रु २००.०० लक्ष अनुदान उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे व या संदर्भात वास्तुविशारदामार्फत सविस्तर अंदाजपत्रक बनविण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्दु भाषा भवनासंदर्भात मुंबई विद्यापीठाच्या अटी शर्ती अल्पसंख्यांक विभागास कळविण्यात आल्या असुन त्यांच्या अभिप्रायानंतर पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## केंद्रस्तरीय समितीने पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयातील सोनोग्राफी केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत नोंदविलेले आक्षेप

**(१५) १७६८८ (३१-०७-२०१५). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गर्भलिंग निदान विरोधी कायदयासंबंधी केंद्रस्तरीय समितीने पुणे येथील ससून सर्वोपचार रुग्णालयाला दिलेल्या भेटीत ससूनमधील सोनोग्राफी केंद्राच्या कार्यपध्दतीबाबत आक्षेप नोंदवले असल्याचे माहे एप्रिल, २०१५ दरम्यान निर्दशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीच्या आक्षेपांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील क्रीडा क्षेत्राचा प्रसार व्हावा व अधिकाधिक विद्यार्थी खेळाकडे वळण्याकरिता सर्व क्रीडापटू विद्यार्थ्यांना २५ गुण देण्याबाबत**

**(१६) १७९२७ (०६-०८-२०१५). श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील क्रीडा क्षेत्राचा प्रसार व्हावा व अधिकाधिक विद्यार्थी खेळाकडे वळावेत याकरिता सर्व क्रीडापटू विद्यार्थ्यांना २५ गुण देण्याचा क्रीडा धोरणातील नियमाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही पूर्ण झालेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रश्नी आतापर्यंत केलेल्या कार्यवाहीचे थोडक्यात स्वरुप काय आहे व त्यानुसार कोणता निर्णय घेतला वा घेण्यात येत आहे,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) मधील प्रकरणी करण्यात येत असलेली कार्यवाही अद्याप पुर्ण झालेली नसल्यास, त्याची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच क्रीडाक्षेत्रातील विद्यार्थ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (१७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) या अनुषंगाने दिनांक २१ एप्रिल, २०१५ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयातील तरतूदीनुसार क्रीडा गुण सवलत देण्यासंदर्भात राज्यातील सर्व एकविध खेळ संघटना, जिल्हा क्रीडा अधिकारी व विभागीय शिक्षण मंडळ यांना सुचित करण्यात आले आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विदर्भातील चंद्रपुर व गडचिरोली जिल्ह्यामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये सुरु करण्याबाबत**

**(१७) १८०९० (१९-०८-२०१५). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे**

**(परांडा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.गोपालदास अग्रवाल (गोंदिया), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.छगन भुजबळ (येवला) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील गोंदिया व चंद्रपूर जिल्हयांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यासाठी केंद्र शासनाकडून सन २०१४ मध्ये निधी मंजूर केला असून एकूण रु.१८९ कोटी पैकी अंदाजे १४२ कोटीचे अनुदान सुध्दा मंजूर करण्यात आले, हे खरे आहे काय,

(२) चंद्रपूर व गडचिरोली जिल्हयांमध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याच्या दृष्टीने आयुर्विज्ञान परिषदेमार्फत नियुक्त केलेल्या त्रि-सदस्यीय समितीने माहे डिसेंबर, २०१४ मध्ये दिलेल्या भेटीच्यावेळी महाविद्यालय स्थापन करण्यात येणा-या अडचणीच्या अनुषंगाने २४ त्रुटी निदर्शनास आणून दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर त्रुटी कोणकोणत्या असून अद्यापपर्यंत किती त्रुटीची पुर्तता शासनाने केली आहे,

(४) उक्त जिल्हयांत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) हे खरे नाही.

जिल्हा रुग्णालयाचा दर्जा वाढवून वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करणे या केंद्र शासनाच्या योजनेअंतर्गत गोंदिया जिल्ह्याची निवड झाली असून त्याप्रमाणे तेथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याकरीता रु.१८९.०० कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव केंद्र शासनास पाठविला आहे. त्यामध्ये केंद्र व राज्य शासनाचा हिस्सा ७५:२५ इतका आहे. याकरीता केंद्र व राज्य शासनामार्फत संचालक (वै.शि) यांच्यामध्ये सामंजस्य करार केलेला आहे.

चंद्रपूर जिल्हयामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय राज्य शासनामार्फत सुरु करण्यात येणार असून तेथील बांधकामाकरीता रु. ६७९.९३ कोटी इतक्या रक्कमेचा प्रस्ताव विचाराधीन आहे.

(२) हे अंशतः खरे आहे.

चंद्रपूर जिल्हयामध्ये प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या निरीक्षणात काही त्रुटी दर्शविण्यात आल्या आहेत.

गडचिरोली जिल्हयामध्ये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापनेबाबत प्रस्तावित करण्यात आलेले नाही.

(३) मुख्यत्वे अध्यापक वृंदाबाबत त्रुटी होती. तथापि, सर्व त्रुटीची पूर्तता करण्यात आलेली आहे.

(४) सन २०१५-१६ मध्ये चंद्रपूर येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाची स्थापन झालेली असून विद्यार्थ्यांचे शैक्षणिक कार्यक्रम सुरु झालेले आहे.

गोंदिया येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सन २०१६-१७ मध्ये सुरु करण्याकरीता केंद्र शासनाकडे अर्ज सादर केला आहे.

---

**नाशिकच्या जिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची केलेली मागणी**

**(१८) १८२१७ (३१-०७-२०१५). श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.राहुल मोटे (परांडा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने जिल्हा रुग्णालयांचे श्रेणीवर्धन करुन देशात ५८ नवीन वैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याचा निर्णय घेतल्यामुळे सदर योजनेद्वारे नाशिकच्या जिल्हा रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन नवीन वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी शासनाकडे दिनांक १२ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीबाबत शासनामार्फत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०१-१०-२०१५) :** (१) होय, जोपर्यत शासन प्रस्तावित ७ शासकीय वैद्यकीय महाविद्यालये पुर्णत: कार्यान्वित होत नाहीत, तोपर्यत नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणे संयुक्तिक ठरणार नाही.

(२) व (३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ३७२ मराठी शाळांना हक्काचे क्रीडांगण नसल्याबाबत**

**(१९) १८४१३ (१०-०८-२०१५). श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील ३७२ मराठी शाळांना हक्काचे क्रीडांगण नसल्यामुळे या शाळांमधील विद्यार्थी शारिरिक व सर्वांगिण विकासापासून वंचित राहत असून शाळांची पटसंख्या कमी होण्यास ही बाब कारणीभूत ठरत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील मराठी शाळांना क्रीडांगण उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, दिनांक २९/०६/२०१३ नुसार शाळेजवळील उपलब्ध जागा अथवा जागा नसल्यास अन्य जागा कराराने उपलब्ध करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील विविध जिल्ह्यातील २१ महाविद्‌यालयांना आयुष तसेच सी.सी.आय या राष्ट्रीय पातळीवरील शासकीय समितीने परवानगी नाकारल्याबाबत**

**(२०) १९२२० (३१-०७-२०१५). श्री.अनिल कदम (निफाड) :** सन्माननीय **वैद्‌यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील विविध जिल्ह्यातील २१ महाविद्‌यालये ही आयुष तसेच सी.सी.आय या राष्ट्रीय पातळीवरील शासकीय समितीने परवानगी नाकारलेली महाविद्‌यालय असल्याचे कळविण्यात आल्यामुळे सदर महाविद्‌यालयात गुणवत्ता यादीनुसार प्रवेश घेतलेल्या १०१९ विद्‌यार्थ्यांचे भवितव्य टांगणीला लागले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रवेश घेतलेल्या विद्‌यार्थ्यांने वर्षभर घेतलेले परिश्रम, प्रवेश घेतांना भरलेले डोनेशन, शिक्षण शुल्क वाया जावून, त्यांना हॉल तिकीट नाकारण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार संबंधित १०१९ विद्‌यार्थ्यांना न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०१-१०-२०१५) :** (१) खरे आहे.

शैक्षणिक वर्ष सन २०११-१२ मध्ये महाराष्ट्र राज्यातील एकूण २१ आयुर्वेद व युनानी महाविद्‌यालयांना त्यांचे महाविद्‌यालयात व रुग्णालयात आयुष विभाग, नवी दिल्ली यांनी परवानगी दिलेली नव्हती.

(२) होय, केंद्र शासनाच्या आयुष विभागाच्या मान्यतेशिवाय प्रवेश घेण्यात आले होते.

(३) आयुर्वेद व युनानी महाविद्‌यालयांना मान्यता देण्याचे अधिकार केंद्र शासनाच्या आयुष विभाग, नवी दिल्ली यांना आहेत. त्यामुळे शासन स्तरावर कार्यवाहीचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील सहाय्यक शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणीतील फरकाची रक्कम त्वरीत देण्याबाबत तसेच प्राथमिक शिक्षकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात**

**(२१) १९६२५ (१०-०८-२०१५). श्री.राजन साळवी (राजापूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लांजा (जि.रत्नागिरी) तालुक्यातील तीन वर्षे पूर्ण झालेल्या सहाय्यक शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणीतील फरकाची रक्कम त्वरीत देण्याबाबत तसेच प्राथमिक शिक्षकांच्या महत्त्वाच्या प्रश्नांसंदर्भात पदवीधर शिक्षक संघटनेतर्फे नुकतेच माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या सुमारास गटशिक्षणाधिकारी यांना लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पदवीधर शिक्षण संघटनेच्या विविध मागण्याच्या निवेदनाबाबत तसेच तीन वर्षे पूर्ण झालेल्या सहायक शिक्षकांच्या नियमित वेतनश्रेणीतील फरकाची रक्कम त्वरित देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) तीन वर्षे पूर्ण झालेल्या सहाय्यक शिक्षकांना त्यांच्या नियमित वेतनश्रेणीतील फरकाची रु. ९३,७२,१६४/- इतकी रक्कम दिनांक ३१ जुलै, २०१५ रोजी त्यांच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### पंचायत युवा क्रीडा अभियानांतर्गत राज्यात निधी उपलब्ध करण्यासंदर्भात

**(२२) २०२२८ (०६-०८-२०१५). श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.सुभाष भोईर (कल्याण ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) ग्रामीण भागातील क्रीडा विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सुरु केलेल्या पंचायत युवा क्रीडा अभियान निधी वाटपात केंद्र सरकारने राज्यास निधीची तरतूद केली असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानुषंगाने पंचायत युवा क्रीडा अभियानांतर्गत राज्यात निधी उपलब्ध करण्यासंदर्भात राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. ग्रामीण भागातील क्रीडा विकासाला गती देण्याच्या उद्देशाने सुरु करण्यात आलेल्या पंचायत युवा क्रीडा व खेळ अभियान या केंद्र पुरस्कृत योजनेचे रुपांतर राजीव गांधी खेल अभियान या योजनेत सन २०१४-१५ वर्षापासून करण्यात आलेले आहे. तद्नुसार सन २०१४-१५ मध्ये केंद्र शासनाने ग्रामीण व महिला तालुका ते राज्यस्तर क्रीडा स्पर्धा आयोजनाकरिता तरतूद राज्य शासनास उपलबध करुन दिलेली आहे. राजीव गांधी खेल अभियान ही केंद्र पुरस्कृत योजना कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### अचलपूर मतदार संघात शासकीय मराठी व उर्दु अध्यापक महाविद्यालयास मान्यता देण्याबाबत

**(२३) २०४४६ (०६-०८-२०१५). श्री.ओमप्रकाश ऊर्फ बच्चू कडू (अचलपूर) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अचलपूर मतदार संघात शासकीय मराठी व उर्दु अध्यापक विद्यालयास शासन मान्यता देण्याबाबत संबंधित लोकप्रतिनिधी यांनी दिनांक २८ मे, २०१५ रोजी पत्राव्दारे शासनाकडे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पत्राच्या अनुषंगाने याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२७-१०-२०१५) :** (१) होय.
(२) शासनाच्या दिनांक १७/१०/२०१२ निर्णयान्वये शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून राज्यात नवीन अध्यापक विद्यालयास संलग्नता न देण्याचा निर्णय घेतला असल्याने कोणतीही कार्यवाही करता येत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चाकण (पुणे) येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (आयआयआयटी) एन पीपीपी या तत्वावर स्थापन करण्याबाबत

**(२४) २०५३५ (३०-०७-२०१५). श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.सुनिल शिंदे (वरळी), डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा), श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण), श्री.चंद्रकांत सोनावणे (चोपडा), श्री.संजय पोतनीस (कलिना), श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चाकण (पुणे) येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (आय.आय.आय.टी.) एन पीपीपी या तत्वावर स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे, हे खरे आहे काय,
(२) भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था (आय. आय. आय. टी.) नागपूरमधील वारंगा येथे स्थापन करण्यास केंद्र शासनाने माहे मे, २०१५ मध्ये वा त्या सुमारास मान्यता दिली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू संस्था उक्त ठिकाणी सुरु करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर संस्था कोणत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु होणार आहे तसेच याबाबतची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) होय.
दिनांक २२/५/२०१५ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला आहे.
(२) होय.
दिनांक १ मे, २०१५ रोजी केंद्र शासनाच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाने नागपूर मधील वारंगा येथे भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था स्थापन करण्यास परवानगी दिली आहे.
(३) या प्रकरणी महसूल व वन विभागाकडून जागा उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तसेच यासंदर्भात सर्व खाजगी सहभागीदारांसमवेत विचार विनिमय सुरु आहे.

(४) या प्रकरणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार संस्थांची स्थापना करणे, तात्पुरत्या कॅम्पस मध्ये शैक्षणिक वर्ष २०१६-२०१७ पासून भारतीय माहिती व तंत्रज्ञान संस्था सुरु करणे इ.कार्यवाही सुरु आहे.

---

**महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नागपूर बोर्डाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यांवर असल्याबाबत**

**(२५) २१२७८ (०६-०८-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळाच्या नागपूर बोर्डाचा कारभार प्रभारी अधिकाऱ्यावर असल्याने दहावी व बारावी बोर्डाच्या निकालास विलंब होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, नागपूर बोर्डाचे अध्यक्ष व सचिव हे पद अनेक महिन्यांपासून रिक्त असून या दोन्ही पदावर प्रभारी अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून नागपूर बोर्डाचे अध्यक्ष श्री. चंद्रमणी बोरकर हे दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ ला निवृत्त झाले असून सचिव श्री. अनिल पारधी यांची दिनांक १ जुलै, २०१४ ला शिक्षण उपसंचालक म्हणून नेमणूक करण्यात आल्यामुळे त्यांना अतिरिक्त जबाबदारी सांभाळावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त दोन्ही महत्वपूर्ण पदावर नविन अध्यक्ष व सचिवांची नियुक्ती करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१९-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) विभागीय अध्यक्ष, नागपूर बोर्ड या पदावर पूर्ण वेळ अधिकारी देण्याची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नागपूर व देवरी (जि. गोंदिया) येथील ट्रामा केअर सेन्टर मधील कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याबाबत**

**(२६) २१२८४ (३१-०७-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.संजय पुराम (आमगाव), श्री.विजय रहांगडाले (तिरोडा), डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथे ११ कोटी ६० लक्ष रु.खर्च करुन ट्रॉमा सेंन्टर बांधण्यात आले असुन या सेंन्टर करिता आवश्यक असलेल्या कर्मचारी

वर्गाकरिता ३०१ पदांच्या मागणीचा प्रस्ताव वैद्यकीय प्रशासनाकडून शासनाला प्राप्त झाला आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच देवरी (जि. गोंदिया) ट्रामा केअर सेन्टर एन.एच.६ वर असून सदर सेन्टरवर पुरेशा सोयी तसेच पुर्ण कर्मचारी वर्ग उपलब्ध नसल्यामुळे जखमी रुग्णांना वेळेवर उपचार करणे गैरसोयीचे होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रश्न भाग (१) व (२) मधील रुग्णालयात आवश्यक त्या रिक्त पदांची त्वरीत नियुक्ती करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०७-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.
शासयकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय नागपूर येथील ट्रॉमा सेंन्टरकरिता आवश्यक असलेल्या ३०१ पदनिर्मितीचा प्रस्ताव संचालक (वै.शि.) यांच्याकडून शासनाला प्राप्त झाला आहे.
(२) हे खरे नाही.
सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत कार्यान्वित ग्रामीण रुग्णालय व ट्रामा केअर युनिट, देवरी येथे एकूण ३६ पदे मंजूर असून त्यातील २५ पदे भरलेली आहेत तसेच त्या ठिकाणी आवश्यक ती यंत्रसामुग्री देखील उपलब्ध करुन देण्यात आली आहे.
(३) भाग (१) बाबत ट्रामा केअर सेन्टर मधील आवश्यक पदनिर्मिती व पदभरतीस मान्यता देण्याचा प्रस्ताव विचाराधीन आहे. तर भाग (२) बाबत प्रश्न उद्‌भवत नाही
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## नागपूर शहरातील शासकीय आयुर्वेद रुग्णालयामधील एक्स-रे पोर्टेबल मशीन मागील सात महिन्यापासून बंद असल्याबाबत

**(२७) २१२९७ (३१-०७-२०१५). श्री.सुधाकर कोहळे (नागपूर दक्षिण), श्री.सुधाकर देशमुख (नागपूर पश्चिम), श्री.कृष्णा खोपडे (नागपूर पूर्व), श्री.विकास कुंभारे (नागपूर मध्य), श्री.समिर मेघे (हिंगणा) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूर शहरातील शासकीय आयुर्वेद रुग्णालयामधील एक्स-रे पोर्टेबल मशीन गत सात महिन्यांपासून बंद पडलेले असुन याबाबत अधिष्ठाता, रुग्णालय यांना प्रस्ताव पाठविला असतानाही मशीन दुरुस्त करण्यात आले नाही, हे खरे आहे काय,
(२) तसेच या बंद मशीनच्या दुरुस्तीचा प्रस्ताव प्रशासनाने वैद्यकीय शिक्षण विभाग, आयुर्वेद संचालक यांच्याकडे पाठविण्यात आला असतानाही अद्यापपर्यंत मंजुरी न मिळण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, उक्त रुग्णालयातील मशीन बंद पडल्याने गोर-गरीब रुग्णांना मेडिकल व खाजगी रुग्णालयामधून एक्स-रे काढावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदरील रुग्णालयातील उक्त दोन्ही मशीन त्वरीत दुरुस्त करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, साधारणत: कंव्हापर्यंत उक्त मशीन दुरुस्त होणे अपेक्षित आहे ?

**श्री. विनोद तावडे (१५-१०-२०१५) :** (१) नाही.पार्टेबल एक्सरे मशीन दुरुस्तीकरिता रु. ३४,८७५/- खर्च करण्यात आले असून सदर मशीन दि. ०७/०७/२०१५ रोजी कार्यान्वित करण्यात आले आहे.

(२) या विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०३.०७.२०१५ अन्वये शासकीय आयुर्वेद रुग्णालय, नागपूर येथील क्ष-किरण यंत्राची दुरुस्ती रु २,५३,१२५/- इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली असून सदर यंत्र दि. २५.७.२०१५ रोजी दुरुस्त करण्यात आले आहे.

(३) नाही. उपरोक्त मशीन दुरुस्त करण्यात आल्यामुळे आता खाजगी रुग्णालयातून एक्सरे काढावे लागत नाहीत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पालघर जिल्ह्यातील तलासरी येथील शासकीय आश्रमशाळा वरखंडा दापचरी येथील २० एकर जागा क्रीडा संकुलासाठी प्रस्तावित असल्याबाबत**

**(२८) २१३६३ (०६-०८-२०१५). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.पास्कल धनारे (डहाणू), श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) तलासरी (जि.पालघर) सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत दुग्ध प्रकल्प दापचरी यांच्या अखत्यारीत येणाऱ्या शासकीय आश्रमशाळा वरखंडा दापचरी येथील २० एकर जागा क्रीडा संकुलासाठी प्रस्तावित केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहेत व त्याअनुषंगाने क्रीडा संकुलाच्या प्रस्तावास तात्काळ मंजूरी मिळण्याबाबत पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) या प्रकरणी चौकशी करण्यात आलेली नाही, तथापि, संबंधित क्षेत्रिय अधिकारी व आमदार महोदयांच्या दरम्यान दिनांक ०५ ऑगस्ट, २०१५ रोजी तलासरी तालुका क्रीडा संकुलाच्या जागेबाबत विस्तृत चर्चा झाली दापचरी दुग्ध प्रकल्पाची जागा डहाणू तालुक्यात येत असून डहाणू मुख्यालयापासून २३ ते २४ कि.मी. अंतरावर असल्याने ती रद्द करण्याचे निश्चित करण्यात आले, तसेच तलासरी शहरात मध्यवर्ती असलेल्या ग्रामीण रुग्णालया शेजारील जवळजवळ ५ एकर शासकीय जागा व त्याला लागून असलेली वन विभागाच्या जागेची पाहणी करण्यात आली व ती हस्तांतरीत करुन घेण्याबाबत संबंधित तहसिलदारासोबत चर्चा झाली असून त्यानुसार पुढील कार्यवाही प्रस्तावित आहे.

---

## चिमुर (जि.चंद्रपूर) येथे राज्याच्या युवा धोरण सन २०१२ अंतर्गत तालुका क्रीडा संकुलात वसतीगृह स्थापण्याबाबत

**(२९) २१३९० (०६-०८-२०१५). श्री.बंटी भांगडिया (चिमूर) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिमुर (जि.चंद्रपूर) येथे राज्याच्या युवा धोरण सन २०१२ अंतर्गत तालुका क्रीडा संकुलात वसतीगृह स्थापण्याबाबत मान्यता प्रदान करण्याचा प्रस्ताव दिनांक १० मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास जिल्हा क्रीडा विभागाकडून आयुक्त क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे यांस सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, चिमुर येथील तालुका क्रीडा संकुलाच्या १६.२० हे. आर. जागेचा उपयोग ग्रामीण भागातील तसेच राज्य तथा राज्याबाहेरील खेळाडुंना सोयी-सुविधा उपलब्ध करण्यासाठी असून सदरील प्रस्तावास मंजूरी देण्यास विलंब होत असल्याने क्रीडांगणास क्रीडा प्रबोधनीचा दर्जा देण्यास विलंब होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रस्तावास मंजूरी न देण्याची कारणे काय आहेत,
(४) उक्त प्रस्तावास त्वरीत मान्यता देण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२०-१०-२०१५) :** (१), (२), (३) व (४) दिनांक २८.४.२०१४ च्या शासन निर्णयानुसार शासनाने राज्यातील महसूल विभागाच्या मुख्यालयाच्या ठिकाणी व विभागीय क्रीडा संकुलाच्या परिसरात प्राधान्याने युवा वसतीगृहाची स्थापना करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. त्यामुळे चिमूर येथे युवा वसतीगृह बांधण्याचा प्रस्ताव विद्यमान धोरणानुसरर विचारात घेणे शक्य होणार नाही. तसेच तालुका क्रीड संकुल, चिमुरला क्रीडा प्रबोधीनीचा दर्जा देण्याचा व क्रीडा प्रबोधीनी स्थापनेबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झाला नसल्याने तालुका क्रीडा संकुलाला प्रबोधीनीचा दर्जा देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील २१ जिल्हयात ग्रंथदालने त्वरीत सुरु करण्याबाबत

**(३०) २१७११ (३१-०७-२०१५). श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **मराठी भाषा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील ३७ जिल्हयापैकी फक्त १६ जिल्हयातच नवसाहित्याची विक्री करणारी ग्रंथदालने असून उर्वरित २१ जिल्हयात सदरील ग्रंथदालने अस्तित्वात नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त उर्वरित जिल्हयात सदरील ग्रंथदालने त्वरीत सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) होय

(२) व (३) महापालिका व नगर पालिकांकडून जे गाळे बांधले जातात त्यातील ५०० ते १००० चौ.फू. आकारमानाचा गाळा अल्पभाडयाने मराठी साहित्य विक्रीसाठी उपलब्ध करुन देण्याबाबत नगर विकास विभागाकडे विचारविनिमय करण्यात येत आहे.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव प्रलंबित असल्याबाबत**

**(३१) २१८४२ (०६-०८-२०१५). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक प्राथमिक शाळांच्या इमारतींची दुरावस्था झाली असुन अनेक गावातील शाळा खोल्याअभावी मंदीर किंवा खाजगी ठिकाणी भरविण्यात येत असल्याने विद्यार्थ्यांना त्रासदायक होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर जुन्या शाळा इमारतींचे दुरुस्तीचे प्रस्ताव निधीअभावी जि.प.कोल्हापूरकडे प्रलंबित असून जिल्ह्यात सुमारे ३०० ते ४०० नवीन शाळा खोल्यांची मागणी असताना केवळ १५० खोल्यांनाच मंजुरी मिळते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त जिल्ह्यातील शाळा इमारतींचे प्रलंबित प्रस्ताव त्वरीत मंजूर करुन सदरहू इमारतीच्या कामास निधी उपलब्ध करण्याबाबत कोणती कार्यवाही केली तसेच नवीन इमारत बांधणी प्रस्तावासाठी लागणा-या निधीसाठी शासनाने कोणती तरतूद केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) अंशत: खरे आहे.

कोल्हापूर जिल्ह्यातील काही प्राथमिक शाळांच्या इमारतींची दुरुस्ती आवश्यक असून त्या शाळा ५१ खाजगी इमारतीमध्ये भरविण्यात येत आहेत. तथापि विद्यार्थ्यांना कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही व पालकांची तशी तक्रार प्राप्त नाही.

(२) सन २०१४-१५ मध्ये सर्व शिक्षा अभियान अंतर्गत नवीन १५० वर्गखोली बांधकामास मंजूरी मिळाली असून शाळा इमारती विशेष दुरुस्तीच्या कामास मंजूरी मिळालेली नाही.

(३) सन २०१५-१६ साठी विशेष दुरुस्तीचे १३ प्रस्ताव मंजूर झाले असून त्याकरिता रु. ११.६० लक्ष तरतूद मंजूर करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चंद्रपूर जिल्ह्यातील ६६ गावातील क्रीडांगणे अपूर्ण असल्याबाबत

**(३२) २२१७५ (०६-०८-२०१५). श्री.नानाजी शामकुळे (चंद्रपूर) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यांमध्ये सन २००८-०९ मध्ये १७० गावांना क्रीडांगण मंजूर झाले असून त्यापैकी ६६ गावातील क्रीडांगणे अपूर्ण असल्याचे माहे मे, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील क्रीडांगणे अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुषंगाने सदरील क्रीडांगणे पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. चंद्रपूर जिल्ह्यातील १५ तालुक्यामध्ये सन २००८-०९ मध्ये ८५ ग्रामपंचायती व १ पंचायत समिती तसेच २००९-१० मध्ये ८५ ग्रामपंचायती व १ पंचायत समितींची निवड केंद्र शासनाच्या पंचायत युवा क्रीडा व खेल अभियान (पायका) अंतर्गत करण्यात आलेली आहे. यापैकी ६६ ग्रामपंचायतींच्या बाबतीत क्रीडांगणासाठी सुयोग्य जागा तसेच वन विभागाकडून जागा संपादित न झाल्यामुळे क्रीडांगणाची कामे अपूर्ण आहेत.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथील क्रीडांगणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत

**(३३) २३२३६ (०६-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणंगले येथील सन २००५ मध्ये प्रशासकीय मंजूरी देण्यात आलेल्या क्रीडा संकुलाचे काम गत १० वर्षापासून प्रलंबित असून सदरील क्रीडा संकूलाच्या कामास मंजूर झालेला निधी खर्च न झाल्याने परत गेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर क्रीडा संकुलाचे काम प्रलंबित राहण्यामागची कारणे काय आहेत,

(३) असल्यास, उक्त क्रीडांगणाचे काम त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) तालुका क्रीडा संकुल, हातकणंगले संकुलासाठी दिनांक २७ मे, २००४ रोजी जागा प्राप्त झाली होती, त्यासाठी रु. ४८.५४ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती, तथापि, सदर जागा जिल्हाधिकाऱ्यांच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरित झाल्याचे निदर्शनास आल्याने तहसील कार्यालय, हातकणंगले यांनी दि. ६ जानेवारी, २००९

च्या आदेशान्वये सदर जागा परस्पर सरकार जमा केली आहे. सद्य:स्थितीत तालुका क्रीडा संकुल, हातकणंगले संकुलासाठी इतरत्र नवीन जागा अथवा तीच जागा प्राप्त करुन घेण्याचे प्रयत्न सुरु आहेत. जागा प्राप्त झाल्यानंतर नवीन डी.एस.आर. नुसार अंदाजपत्रक व आराखडे तयार करण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

---

**कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे सन २०१४-१५ पासून वेतन अनियमित होत असल्याबाबत**

**(३४) २३२४४ (१०-०८-२०१५). श्री.सुरेश हाळवणकर (इचलकरंजी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांचे सन २०१४-१५ पासून वेतन अनियमित होत असल्यामुळे शिक्षकांना आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागत असल्याचे माहे मे, २०१४ मध्ये निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शिक्षकांचा माहे फेब्रुवारी व मार्च, २०१५ चे वेतन माहे एप्रिल, २०१५ मध्ये झाले असून माहे एप्रिल व मे, २०१५ चे वेतन अद्यापपर्यंत थकीत असल्याने या विरोधात प्राथमिक शिक्षकांनी आंदोलन करून वेळोवेळी शासनाला निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर वेतन थकीत राहण्याची कारणे कोणती व नियमित वेतन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे.

(२) होय.

(३) शालार्थ प्रणालीत तांत्रिक अडचण उद्भवल्यामुळे सदर वेतन थकीत राहीलेले होते.

---

**महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने तपासणी अहवालात सुचविण्यात आलेल्या सुधारणा व दोषी आढळलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाबाबत**

**(३५) २३२९५ (३१-०७-२०१५). श्री.राहूल कुल (दौंड), श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) : अतारांकित प्रश्नोत्तरांची यांदी क्रमांक १ मधील प्रश्न क्रमांक २६७ ला सभागृहात दिनांक १२ मार्च, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने प्रथम टप्प्यात केलेल्या तपासणी अहवालावर विद्यापरिषदेने काय निर्णय घेतला आहे,

(२) असल्यास, सदर अहवालात सुचविण्यात आलेल्या सुधारणा लागू करण्यासाठी तसेच दोषी आढळलेल्या वैद्यकीय महाविद्यालयाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) ज्या वैद्यकीय व दंत महाविद्यालयातील वसतीगृह व ग्रथालयांची व्दिसदस्यीय समितीमार्फम तपासणी करण्यात आली होती, त्या तपासणीमध्ये आढळलेल्या त्रुटीची पुर्तता झाली असल्याची खातरजमा संलग्नीकरणाचे नुतनीकरण /विस्तारीकरण प्रदान करण्याअगोदर करण्यात यावी असा विद्यापरिषदेने ठराव केला.
(२) सदर ठरावाच्या अनुषंगाने विद्यापरिषदने सूचविलेले मुद्दे संबंधित महाविद्यालयाला शैक्षणिक वर्ष सन २०१५-१६ या वर्षाचे संलग्नीकरणाचे नुतनीकरणाबाबतच्या त्रुटीबाबत कळविण्यात आले असून त्रुटी पूर्तता करण्यासाठी दिनांक ३० जून, २०१५ पर्यतचा कालावधी देण्यात आलेला होता. उपस्थित केलेल्या मुद्यांची ज्या महाविद्यालयांनी त्रुटी पूर्तता केलेली नाही अशा महाविद्यालयांना संलग्नीकरणाचे नुतनीकरण प्रदान करताना पुन:श्च त्रुटीचा उल्लेख करण्यात येवून तीन महिन्याच्या आत त्रुटी पूर्तता करण्याबाबत कळविण्यात येत आहे.
(३) विलंबाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**नागपूरच्या शासकीय दंत महाविद्यालयात बालदंतरोग प्रतिबंधात्मक (पेडोडॉन्टिक अॅण्ड प्रिव्हेटिव्ह डेंटिस्ट्री-पीपीडी) या विषयाचे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत**

**(३६) २३३९१ (३१-०७-२०१५). श्रीमती तृप्ती सावंत (वांद्रे पूर्व), श्री.सुनिल प्रभू (दिंडोशी), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा), श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस) :** सन्माननीय **वैद्यकीय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नागपूराच्या शासकीय दंत महाविद्यालयात बालदंतरोग प्रतिबंधात्मक (पेडोडॉन्टिक अॅण्ड प्रिव्हेटिव्ह डेंटिस्ट्री-पीपीडी) या विषयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यास केंद्र शासन आणि सर्वोच्च नियामक संस्था असलेल्या डेंन्टल कॉन्सील ऑफ इंडियाने (डीसीआय) मान्यता दिली असतांना महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने या अभ्यासक्रमाला संलग्नता देण्यास नकार दिला आहे हे खरे आहे काय,
(२) असल्यास, मुंबईतील नायर महानगरपालिका रुग्णालयाव्यतिरीक्त राज्यातील ३ शासकीय दंत महाविद्यालयात पीपीडी या विषयात पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम उपलब्ध नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर अभ्यासक्रमात पदवी शिक्षण घ्यावयाचे असल्यास विद्यार्थ्यांना खाजगी महाविद्यालयांवर अवलंबुन राहून त्यांचे आर्थिक नुकसान होत असल्याने शासन महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाने पुर्नविचार करुन मान्यता देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) भारतीय दंत परिषदेच्या मान्यतेनुसार शिक्षकांच्या त्रुटी पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने कळविले आहे. त्रुटीची पुर्तता करताच सदर महाविद्यालयास पहिल्या वेळेचे संलग्निकरण देण्याची कार्यवाही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत करण्यात येऊन सन २०१६-१७ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे प्रवेश देणे शक्य होईल.
(२) हे खरे आहे.
(३) सदर महाविद्यालयास भारतीय दंत परिषदेच्या मान्यतेनुसार शिक्षकांच्या त्रुटी पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने कळविले आहे. आरोग्य विज्ञानात गुणवत्ता पूर्ण शिक्षण देण्यासाठी त्रुटींची पुर्तता केल्यानंतरच महविद्यालयांना पहिल्या वेळेचे संलग्निकरण देण्याची कार्यवाही महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठामार्फत करण्यात येते.
(४) त्रुटी पुर्ततेची कार्यवाही शासन स्तरावर सुरु आहे.

---

### पोलादपूर तालुक्यातील (जि.रायगड) नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माऊली प्रशाला कोतवाल बुद्रुक येथील माध्यमिक शिक्षकावर सातत्याने मुख्याध्यापक आणि संस्थेकडून होत असलेला अन्याय

**(३७) २३७२८ (१०-०८-२०१५). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पोलादपूर (जि.रायगड) तालुक्यातील नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळाच्या माऊली प्रशाला कोतवाल बुद्रुक येथील माध्यमिक शिक्षकावर सातत्याने मुख्याध्यापक आणि संस्थेकडून अन्याय झाल्याने निवारणासाठी पोलादपूर पंचायत समिती कार्यालयासमोर दिनांक १७ जून, २०१५ पासून बेमुदत आमरण उपोषण करण्याचा इशारा अन्यायग्रस्त शिक्षकाने दिला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात रायगड जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकारी यांना प्रचलित शासन नियमानुसार कार्यवाही करण्यासंदर्भात शिक्षण उपसंचालक यांनी माहे डिसेंबर, २००४ ला आदेश देऊनही अद्याप कोणतीच कार्यवाही न करण्याची कारणे काय आहेत,
(३) असल्यास, या संदर्भात शासनाने सखोल चौकशी केली आहे काय, त्यात काय निष्पन्न झाले व त्यानुसार शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

---

**अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवा परिक्षा पुर्व प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीकरीता निधी उपलब्ध करुन देणेबाबत**

**(३८) २४०७९ (३०-०७-२०१५). डॉ.सुनिल देशमुख (अमरावती), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अमरावती येथे भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलिस सेवा व तत्सम विविध स्पर्धा परीक्षेमध्ये सहभागी होणा-या विद्यार्थ्यांकरीता प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यात आले असून या केंद्राच्या इमारतीच्या प्रस्तावास शासनाने मान्यता प्रदान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीच्या प्रत्यक्ष बांधकामास केंव्हापर्यंत सुरुवात होणे अपेक्षित आहे,

(३) तसेच या प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षणार्थ्यांच्या विद्यार्थी संख्या ७० वरुन १०० पर्यंत करण्याचा प्रस्ताव देखील मान्य करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) व (२) नाही. प्रस्ताव विचाराधीन आहे.

(३) नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाडा तालुक्यातील (जि.पालघर) मध्यवर्ती असलेल्या कामे गावाच्या हद्दीत असलेल्या भूखंडाचा वापर खेळाच्या मैदानासाठी करण्याबाबत**

**(३९) २४३६७ (०६-०८-२०१५). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाडा तालुक्यातील (जि.पालघर) मध्यवर्ती ठिकाण असलेले कामे या गावाच्या हद्दीत जिल्हा क्रीडा अधिकारी विभागाच्या नावे १६ एकर १४ गुंठे ऐवढे क्षेत्र असलेला भूखंड पडित असून सदर भूखंडाचा वापर विद्यार्थ्यांसाठी खेळाचे मैदान करण्यासाठीची मागणी तालुक्यातील विद्यार्थ्यानी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) हे खरे आहे

(२) व (३) शासन निर्णय क्र. बैठक-२०१५/प्र.क्र.६५/क्रीयुसे-१, दि. २ सप्टेंबर, २०१५ च्या अनुषंगाने राज्यातील क्रीडा संकुलांच्या बांधकामाबाबत सुधारीत कार्यपध्दती विहीत करण्याच्या दृष्टीने शासनास शिफारशी सादर करण्याकरिता आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली राज्य स्तरीय समिती व संबंधित उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा यांच्या अध्यक्षतेखाली विभाग स्तर समिती गठीत करण्यात आली असून त्यानुसार पुढील कार्यवाही सुरु आहे.

---

**यवतमाळ जिल्हयातील २५४ ग्रामपंचायतींना केंद्र शासनाच्या पंचायत युवा व खेळ, क्रीडा अभियान (पायका) अतंर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानात झालेला गैरव्यवहार**

**(४०) २४५८९ (०६-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील २५४ ग्रामपंचायतींना केंद्र शासनाच्या पंचायत युवा व खेळ, क्रीडा अभियान (पायका) अतंर्गत केंद्र शासनाकडून सन २००८ ते २०१३ या कालावधीत यवतमाळ जिल्हयास २,७९,४०,०० रुपयांचे अनुदान प्राप्त झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, लाभार्थी ग्रामपंचायतींनी या अनुदानातून क्रीडांगणे तयार न करता बनावट विनियोग प्रमाणपत्रे दाखवून एकूण १० हजार रुपयांच्या क्रीडा साहित्याचा गैरव्यवहार केला हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पायका योजनेंतर्गत कोट्यावधी रुपयांचे गैरव्यवहार झाले असल्याचे पहिल्यांदा माहे ऑगस्ट, २०१२ मध्ये व त्यानंतर मे, २०१३ मध्ये मौजे भोसा येथील अब्दुल शेख यांनी केलेल्या तक्रारीवरुन जिल्हाधिकारी यांनी चौकशी आदेश दिले परंतू अद्यापपर्यंत या संदर्भात दोषींविरुध्द कोणतीही कारवाई झाली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रश्नाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, असल्यास, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार संबंधित दोषींवर शासनाने पुढे कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही. सन २००८-०९ व २००९-१० या कालावधीत यवतमाळ जिल्हयातील २४२ ग्रामपंचायती व ४ पंचायत समितींना केंद्र शासनाच्या पंचायत युवा क्रीडा व खेल अभियान (पायका) अंतर्गत केंद्रशासनाकडून रु.२६७.०० लक्ष अनुदान प्राप्त झालेले आहे.

(२), (३), (४) व (५) जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे आदेशानुसार जिल्हा परिषदेच्या वतीने गट विकास अधिकारी यांचेद्वारे तपासणीचे काम करण्यात येत आहे.

---

**यवतमाळ जिल्हयातील झारी, घाटंजी, मारेगाव, यवतमाळ, दिग्रस, कळंब येथील क्रीडा संकुलाची कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत**

**(४१) २४५९३ (०६-०८-२०१५). श्री.मदन येरावार (यवतमाळ), प्रा.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ जिल्हयातील झारी, घाटंजी, मारेगाव, यवतमाळ, दिग्रस, कळंब येथील क्रीडा संकुलाच्या कामाकरीता ७ कोटी ५० लक्ष रुपयांचा निधी प्राप्त झाला असतानाही अद्याप उक्त ठिकाणची क्रीडा संकुलाची कामे प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त क्रीडा संकुलाची प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) व (२) यवतमाळ जिल्ह्यातील कळंब तालुका क्रीडा संकुलाच्या बाबतीत ग्रामपंचायतीच्या मालकीची भूमापन क्र.६२६ मधील ७ एकर जागा दिनांक २१.०७.२००७ रोजी प्राप्त झाली होती. सदर जागेवरील रिटर्निग वॉलकरिता रु.१५ लक्ष खर्च करण्यात आले. परंतु सदर जागेवर वाद निर्माण झाल्याने सद्य:स्थितीत काम बंद आहे. कळंब तालुका क्रीडा संकुलाकरिता वितरित करण्यात आलेल्या रु.१.०० कोटी निधीपैकी रु.८५.०० लक्ष निधी शिल्लक आहे.

यवतमाळ जिल्ह्यातील झारी, घाटंजी, मारेगाव, यवतमाळ, दिग्रस या तालुका क्रीडा संकुलाकरिता जागा प्राप्त करण्याच्या दृष्टीने कार्यवाही चालू आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

### सोलापूर जिल्ह्यातील शिक्षकांना भविष्य निर्वाह निधीवरील व्याज मिळण्याबाबत

**(४२) २४६३२ (२३-०८-२०१५). श्री.सुभाष देशमुख (सोलापूर दक्षिण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील ९८७० शिक्षकांचे दरमहा ४ कोटी रुपये भविष्य निर्वाह निधीत जमा होतात, असे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच या रकमेवर सन २०१३-१४ व २०१४-१५ या दोन वर्षांचे व्याज अद्यापपर्यंत मिळाले नाही असे निदर्शनास आले आहे. हे खरे आहे काय,

(३) असल्यास, शिक्षकांचे भविष्य निर्वाह निधीवरील व्याज मिळण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-११-२०१५) :** (१) होय हे खरे आहे,

(२) होय हे खरे आहे,

(३) व (४) दरमहा तीन कोटी पंचाण्णव लाखाच्या आसपास रक्कम जमा करण्यात येते, सन २०१३-१४ चे लेखे अपूर्ण असल्याने सन २०१४-१५ चे व्याज आकारण्याचे काम अपूर्ण आहे, सदर लेखे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

---

### क्रीडांगणे आणि व्यायामशाळांच्या विकासासाठी शासनातर्फे देण्यात येत असलेले अनुदान

**(४३) २४९९९ (०६-०८-२०१५). श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील क्रिडांगणे आणि व्यायामशाळांच्या विकासासाठी शासनातर्फे अनुदान देण्यात येणार असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) व (२) शासन निर्णय, दिनांक २२.०१.२०१४ अन्वये व्यायामशाळा बांधकाम /साहित्य खरेदी या करीता रु.७.०० लक्ष व शासन निर्णय, दिनांक १३.०२.२०१४ अन्वये क्रीडांगण विकासाठी रु.७.०० लक्ष इतके अनुदान देण्याची योजना लागू करण्यात आली आहे. सदर योजना राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात संबंधित जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत राबविण्यात येते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**केळापूर शिक्षण संस्था पांढरकवडा (जि.यवतमाळ ) या संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत**

**(४४) २५२४४ (०६-०८-२०१५). श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केळापूर शिक्षण संस्था पांढरकवडा (जि.यवतमाळ) या संस्थेवर प्रशासकाची नियुक्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी (आर्णी) यांनी मा.शालेय शिक्षण मंत्री यांना दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजी निवेदन देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त निवेदनावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे, असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरुप काय आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) सदर निवेदनाच्या अनुषंगाने सविस्तर चौकशी करुन प्रचलित नियमानुसार तात्काळ कार्यवाही करण्याबाबत आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय कळविण्यात आले आहे. शाळेविरुध्द तक्रार प्राप्त झाल्यानंतर शिक्षण संचालक सुनावणी घेऊन अधिनियम १९७६ चे कलम ३ (१) प्रमाणे प्रशासक नियुक्तीचा निर्णय घेतात. सदर प्रकरणी संचालक स्तरावर अद्याप कार्यवाही सुरु आहे.

---

**मालेगाव (जि.वाशिम) येथे तालुका क्रीडा संकुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असल्याबाबत**

**(४५) २५७१२ (०६-०८-२०१५). श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालेगाव (जि.वाशिम) येथे तालुका क्रीडा संकुलाचे काम अत्यंत संथ गतीने सुरु असुन अद्याप या ठिकाणी इमारत बांधकामास सुरुवात करण्यात आली नसल्याचे दिनांक ५ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, क्रीडा संकुलाअभावी ग्रामीण भागातील खेळाडू खेळापासून वंचीत राहून त्यांची गैरसोय होत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) होय, हे खरे आहे.
(२), (३) व (४) संकुल बांधकामाकरिता मंजूर अनुदान टप्प्या टप्प्याने पूर्णत: रु. १.०० कोटी विपरीत केले असून या निधीतून संकुलाच्या जागेवर पहिल्या टप्प्यात संरक्षण भिंतीच्या बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला दिनांक २९ नोव्हेंबर, २०१४ रोजी रु. ३०,०२,८००/- इतका निधी वर्ग करण्यात आला आहे. सदरचे काम अंतिम टप्प्यात आहे, तसेच दुसऱ्या टप्प्यातील २०० मी. धावनपथ, बहुउद्देशिय इमारत हॉलचे बांधकाम, कबड्डी, खो खो व व्हॉलीबॉल मैदाने प्रत्येकी दोन, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत रस्ते पाणी पुरवठा, कार्यालयीन इमारत इ. बाबींचे अंदाज पत्रक व आराखडे प्राप्त करुन घेण्याकरिता जिल्हा क्रीडाअधिकारी, वाशिम यांच्या स्तरावरुन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे. त्यानंतर उपलब्ध निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे वर्ग करुन तालुका क्रीडा संकुलाचे काम प्राथम्याने पूर्ण करण्याचे प्रस्तावित आहे.

---

## राज्यातील ग्रंथालयांना अनुदान मिळणेबाबत

**(४६) २६३२८ (३०-०७-२०१५). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सार्वजनिक ग्रंथालयांना वर्षा अखेर मिळणा-या अनुदानातून ५० टक्के रक्कम पुस्तक व इतर साहित्यांसाठी खर्च करावी लागते, परंतु राज्यातील सुमारे १२,३७८ सार्वजनिक ग्रंथालयांना वर्षभरापासून अनुदानच मिळाले नसल्याने राज्यभरातील ग्रंथालये पुस्तकांच्या प्रतिक्षेत असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सन २०१४-१५ च्या दुस-या टप्प्याचे सार्वजनिक ग्रंथालयाचे अनुदान माहे मार्च, २०१५ चे अगोदर मिळणे आवश्यक होते. परंतु अनुदान मिळाले नसल्याने नविन पुस्तकांची खरेदी झाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, ग्रंथालयांना थकीत अनुदान देण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (१२-१०-२०१५) :** (१) हे खरे नाही.
राज्यातील शासनमान्य ११,९९६ सार्वजनिक ग्रंथालयांना रु. ८३१९.६० लक्ष व १५४ ग्रांमपंचायत ग्रंथालयांना रु. १८०.२२ लक्ष निधी सहाय्यक अनुदानासाठी वितरीत करण्यात आलेला आहे.

(२) हे खरे नाही.

ग्रथालयाच्या दर्जा/वर्गवारीनुसार ग्रंथालयात ग्रंथ संपादित करण्यात येतात.

(३) सार्वजनिक ग्रंथालयांना अनुदान पूर्णतः प्रदान करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**वाशिम जिल्हयातील जि.प. अंतर्गत ७८८ शाळांमधील शिक्षकांचे वेतन त्वरीत देण्याबाबत**

**(४७) २६५५४ (१०-०५-२०१५). श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत ७८८ शाळांमधील सुमारे ३२१७ शिक्षकांचे वेतन गत तीन महिन्यांपासून प्रलंबित असल्यामुळे या शिक्षकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने त्यांचे वेतन तातडीने करण्याबाबतचे निवेदन महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघाचे जिल्हा प्रशासन व प्रशासनाकडे दिनांक २ जून, २०१५ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त शाळेतील सबंधित शिक्षकांचे वेतन त्वरीत देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) होय.

(२) माहे जुलै, २०१५ पर्यंतचे वेतन अदा करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भोकरदन (जि.जालना) येथील मॉडेल स्कुल चालू वर्षी पासून कायमस्वरुपी सुरु ठेवण्याबाबत**

**(४८) २७१०९ (१०-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भोकरदन (जि. जालना) येथील मॉडेल स्कुलची इमारत बांधकाम पूर्ण असून सदरील मॉडेल स्कुल चालू वर्षी पासून कायमस्वरुपी सुरु ठेवण्यासाठी माहे जून वा त्यादरम्यान पालकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना भेटून निवेदन दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त जिल्हयातील भोकरदनसह सर्व मॉडेल स्कुल सुरू ठेवण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०६-१०-२०१५) :** (१) अशंत: खरे आहे.

भोकरदन (जि.जालना) येथील मॉडेल स्कूल ची इमारत बांधकाम सुरु आहे. सदरील योजना बंद झाल्यामुळे बांधकाम थांबविण्यात आले आहे. दि.९/६/२०१५ रोजी पालकांनी मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.जालना यांना भेटून सदरील मॉडेल स्कूल कायम स्वरुपी सुरु ठेवण्यासाठी निवेदन दिले.

(२) केंद्र शासनाने योजना बंद केल्याने सदर योजना राज्यामध्ये बंद करणेबाबतचा निर्णय घेतला आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**जालना शहरातील क्रीडा संकुलाची झालेली दुरवस्था**

**(४९) २७११७ (०६-०८-२०१५). श्री.अर्जुन खोतकर (जालना), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **क्रीडामंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जालना शहरात असलेल्या क्रीडा संकुलाची दुरवस्था झाली असुन सदरील क्रीडांगणास दुरुस्तीसाठी निधी प्राप्त होवून दुरुस्ती करण्यात येत नाही तसेच अंबड घनसावंगी, मंठा, परतुर, भोकरदन येथे क्रीडा संकुलाची कामे अत्यंत संथगतीने सुरु आहेत व जालना, बदनापुर, जाफ्राबाद या तालुक्यांना क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी जागेचा शोध सुरू असल्याचे नुकतेच माहे फेब्रुवारी, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्यानुसार सदरील क्रिडांगणाची कामे त्वरीत सुरू करण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (२३-१०-२०१५) :** (१) व (२) हे खरे नाही. जालना जिल्हा क्रीडा संकुल हे स.न. ४४८ मधील १५ एकर जमीनीवर उभारले असून सदर संकुल बांधकामसाठी टप्याटप्याने एकुण रु. ८००.०० लक्ष निधी वितरीत केला आहे. सद्यस्थितीत शासन निर्णय नुसार क्रीडा सुविधा उपलब्ध करण्यात आलेल्या असुन क्रीडा संकुलातील सोई-सुविधांचा वापर नियमितपणे खेळांडूंसाठी करण्यात येतो. सन २०१३-१४ मध्ये झालेल्या वादळी वारा व पावसाने जिल्हा क्रीडासंकुलातील एका प्रेक्षक गॅलरीचे नुकसान झाले आहे. तथापि बांधकामासाठी प्राप्त अनुदानातुन दुरुस्तीचे कामे हाती घेत येत नसल्याने प्रेक्षक गॅलरीच्या दुरुस्तीचे काम जिल्हा क्रीडा संकुल समितीला हाती घेता आले नाही. सदर दुरुस्तीबाबत अंदाजपत्रक आराखडा सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत तयार झाल्यानंतर सदरचे काम व इतर सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून अथवा उद्योजक संघटनेकडून तातडीने हाती घेण्यात येवून संकुलाची दुरुस्ती करण्याचे प्रस्तावित आहे.

अंबड, घनसावंगी, मंठा, भोकरदन तालुका क्रीडा संकुलाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात येत असून क्रीडा संकुलाचे बॅडमिंटन हॉल, प्रशासकीय इमारत, २०० मी. धावन पथ कम्पाउंड वॉल, विविध खेळाची मैदाने इ. ची कामे पूर्ण झाली आहेत.

परतुर तालुका क्रीडा संकुलाची जागा नगरपरिषदेची असून या जागेवर अतिक्रमण असल्याने अतिक्रमण हटविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. सद्यस्थितीत प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. जालना तालुका क्रीडा संकुलास जागा प्राप्त झालेली असून मोजणी करुन जागेचा ताबा लवकरच घेण्यात येईल. जाफ्राबाद व बदनापूर तालुका क्रीडा संकुलासाठी जागेची निवड करुन प्रस्ताव तहसिलदारामार्फत जिल्हाधिकारी यांचेकडे सादर करण्यात आला असून मंजूरी आदेश प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे.

शासन निर्णय दिनांक ०२.०९.२०१५ अन्वये राज्यातील क्रीडा संकुलाच्या बांधकामाबाबत सुधारित कार्यपध्दती विहित करण्यासाठी राज्यस्तर व विभागस्तर समिती स्थापन करण्यात आलेली असून सदर दोन्ही समितीचा अहवाल शासनास सादर झाल्यानंतर घेण्यात येणाऱ्या अंतिम निर्णयानंतर तालुका क्रीडा संकुलासाठी निधी वितरित / मान्यतेची कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे मासाळवाडी, म्हसवड (ता.माण, जि.सातारा) येथील माध्यमिक विद्यालयाचा शहरी बृहत आराखड्यात समावेश करण्याबाबतचा प्रस्ताव**

**(५०) २७४९९ (१०-०८-२०१५). श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मासाळवाडी, म्हसवड (ता.माण, जि.सातारा) येथील माध्यमिक विद्यालयाचा शहरी बृहत आराखड्यात समावेश करण्याबाबतचा संपूर्ण अहवाल विस्तार अधिकारी माण, उपशिक्षण अधिकारी सातारा, शिक्षण अधिकारी, उपसंचालक कोल्हापूर यांचे कार्यालयातून संचालक विभागाला पाठविण्यात आलेल्या प्रस्तावावर अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नसल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला व त्यानुसार सदरील प्रस्तावावर पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. विनोद तावडे (०८-१०-२०१५) :** (१) व (२) सदरचा प्रस्ताव विभागीय शिक्षण उपसंचालक यांचे पत्र दिनांक १२/२/२०१४ अन्वये शिक्षण संचालनालय (माध्यमिक व उच्च माध्यमिक) महाराष्ट्र राज्य पुणे यांचेकडे प्राप्त झाला सदर प्रस्तावामध्ये सन २००१ च्या लोकसंख्येचे प्रमाणपत्र तसेच माध्यमिक शाळांमधील अंतराबाबत स्पष्टता नसल्यामुळे सदरची प्रमाणपत्रे

सादर करण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांना कळविलेले होते. त्यानुसार त्यांचेकडून प्रमाणपत्र व वस्तुनिष्ठ माहिती जुलै, २०१५ मध्ये संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) प्राप्त झालेली असून सदर प्रस्ताव शिक्षण संचालनालय स्तरावर तपासून शासनास सादर करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.